१४ वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार कार्यरत न्यायालयाचे नुतनीकरण या योजनेंतर्गत जिल्हा न्यायालय, सोलापूर येथील न्यायालयीन इमारतीची दुरुस्ती/ नुतनीकरणास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
विधि व न्याय विभाग
शासन निर्णय क्रमांक: संकिर्ण ०९१६/६८६/प्र.क्र.१२१/कार्या.११
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : २४ जानेवारी, २०१८

वाचा : १. शासन निर्णय, विधि व न्याय विभाग क्र.चौविआ १२१६/प्र.क्र.१०७/कार्या.९, दि.१०/११/२०१६.
२. शासन निर्णय, विधी व न्याय विभाग क्र.चौविआ १२१६/प्र.क्र.१०/कार्या.९, दि.१२/१/२०१८
३.प्रबंधक (निरिक्षणे २), उच्च न्यायालय यांचे पत्र क्र.B(W) ६०४९/२०१०/२४२८, दि.१/९/२०१६
३. जिल्हा न्यायालय, सोलापूर यांचे पत्र क्र.Admn/D-१/५७१४/२०१६, दि.२५/७/२०१६

प्रस्तावना :

१४ व्या केंद्रीय वित्त आयोगाने शिफारस केलेल्या “न्याय व्यवस्थेचे सक्षमीकरण” (Strengthening the Justice) या प्रयोजनासाठी सन २०१५-२०१६ ते २०१९-२०२० या ५ वर्षाच्या कालावधीकरीता महाराष्ट्र राज्यासाठी रुपये १०१४ कोटी इतक्या निधीची शिफारस केली आहे. १४ व्या वित्त आयोगांतर्गत कार्यरत न्यायालयाचे नविनीकरण या घटकासाठी ५ वर्षाच्या कालावधीकरीता रु.२२८ कोटी इतक्या निधीची तरतूद करण्यात आली आहे. १४ व्या वित्त आयोगाने केलेल्या शिफारशींची कार्यक्षम अंमलबजावणी करण्यासाठी दि.९/३/२०१६ रोजी उच्चस्तरीय संनियंत्रण समिती गठीत करण्यात आलेली आहे. या समितीच्या दि.२८/३/२०१६ रोजीच्या बैठकीमध्ये मा.उच्च न्यायालयाकडुन प्राप्त झालेल्या कृती आराखड्यास तत्वत: मान्यता देण्यात आली. या बैठकीचे इतिवृत्त दि.१६/०५/२०१६ रोजी निर्गमित करण्यात आले. त्यामध्ये न्यायालयाच्या नुतनीकरणाच्या ज्या प्रस्तावाची किंमत रु.५० लक्षपेक्षा अधिक असेल असे प्रस्ताव मान्यतेसाठी उच्चस्तरीय संनियंत्रण समितीसमोर सादर करण्याचे ठरले. मा.उच्च न्यायालयाकडून प्राप्त झालेल्या व सार्वजनिक बांधकाम विभागाच्या तपासणीअंती ज्या प्रस्तावाची किंमत रु.५० लक्षपेक्षा अधिक आहे, असे ९१ प्रस्ताव उच्चस्तरीय संनियंत्रण समितीच्या मान्यतेसाठी सादर केले असता त्यावर चर्चा होऊन सदर प्रस्तावास उच्चस्तरीय संनियंत्रण समितीच्या दि.८/१२/२०१७ रोजी झालेल्या बैठकीत मान्यता देण्यात आली आहे. या अनुषंगाने विधि व न्याय विभागास प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार दि.१२/१/२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्व्ये प्रदान करण्यात आले आहेत. तसेच सदर९१ प्रस्तावाच्या प्रशासकीय मान्यतेस मा.मुख्यमंत्री महोदय यांची मान्यता घेण्यात आली आहे.

सदर ९१ प्रस्तावात जिल्हा न्यायालय, सोलापूर येथील न्यायालयीन इमारतीची दुरुस्ती / नुतनीकरणाचा प्रस्ताव समाविष्ट करण्यात आला आहे. उपरोक्त संदर्भ क्र.३ येथे नमूद पत्रान्वये सन २०१६-२०१७ च्या दरसूचीवर आधारीत जिल्हा न्यायालय, सोलापूर येथील न्यायालयीन इमारतीची दुरुस्ती / नुतनीकरणाचे प्रस्ताव मा.उच्च न्यायालय, मुंबई यांचेकडून शासनास प्राप्त झाले आहेत. त्याबाबतची अंदाजपत्रके संबंधित उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, सोलापूर यांनी तयार केली असून संबंधित कार्यकारी अभियंता तसेच प्रधान जिल्हा व सत्र न्यायाधीश, जिल्हा न्यायालय, सोलापूर यांनी साक्षांकित केली आहेत. तसेच सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी सदर अंदाजपत्रक तपासून प्रशासकीय मान्यतेस सहमती दर्शविली आहे. त्यानुसार खालीलप्रमाणे नमूद केलेल्या कामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्याची बाब विचाराधीन होती.

शासन निर्णय :

१४ व्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार कार्यरत न्यायालयाचे नुतनीकरण या योजनेअंतर्गत जिल्हा न्यायालय, सोलापूर येथील न्यायालयीन इमारतीच्या दुरुस्ती /नुतनीकरणासाठी येणाऱ्या रुपये ६४,०६,३४०/- (अक्षरी रुपये चौसष्ठ लाख सहा हजार तीनशे चाळीस फक्त) इतक्या रकमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

२. जिल्हा न्यायालय, सोलापूर येथील न्यायालयीन इमारतीच्या दुरुस्ती/ नुतनीकरणाच्या कामाचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

अ.क्र.	न्यायालयीन इमारत	कामाचे स्वरुप	सा.बां.विभागाने अंदाजपत्रकामध्ये परिगणित केलेली रक्कम (रुपये)
१	सोलापूर	Construction of valunerable witness deposition center	१३,८३,६३४/-
		Construction of witness box for wheel chair user	१०,६८,५४३/-
		Construction of oneway glass partition arrangement	९,६०,६०७/-
		Construction of closed cubical for accused having one way glass	५,३४,०६९/-
		Construction of toilet block for wheel chair user	१२,८०,०२८/-
		Providing and fixing braille symbol and auditory signals in toilets	५३,४१०/-
		Providing and preparing barrier free court & court room for person with disabilities	५८,२१७/-
		Construction of sanitation facilities	१०,६७,८३२/-
		एकूण	**६४,०६,३४०/-**

३. जिल्हा न्यायालय, सोलापूर येथील न्यायालयीन इमारतीच्या दुरुस्ती/ नुतनीकरणासाठी येणारा खर्च “मागणी क्र.जे-१, २०१४ न्यायदान १०२- उच्च न्यायालये, (११) कार्यरत न्यायालयाचे नविनीकरण, (११) (०१) कार्यरत न्यायालयाचे नविनीकरण (२०१४ ०५४८) या लेखाशीर्षाखाली मंजूर झालेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

४. सदर कामाची निविदा मागविण्यापूर्वी उपरोक्त कामे मा.उच्च न्यायालय, मुंबई यांच्या Dedicated Cell ने निश्चित केलेल्या कामामधीलच असल्याची खातरजमा करण्याची तसेच सदर अंदाजपत्रक सक्षम अधिकाऱ्यांकडून साक्षांकित करण्याची जबाबदारी प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, जिल्हा न्यायालय, सोलापूर यांची राहील. प्रचलित कार्यपध्दतीचा अवलंब करुन ई-निविदा प्रक्रिया कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, सोलापूर यांच्याकडून राबविण्यात यावी व या प्रशासकीय मान्यतेच्या अनुषंगाने इतर अनुषंगिक कार्यवाही पूर्ण करावी.

५. हा शासन निर्णय सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अनौ.सं.क्र.४९२/इमा-२, दि.१२/७/२०१७ व त्या विभागाच्या सहमतीने तसेच शासन निर्णय विधि व न्याय विभाग,क्र.चौविआ १२१६/प्र.क्र.१०/का.नऊ, दि.१२/१/२०१८ अन्वये विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांच्या अधीन राहून निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८०१२४१५२८२८४९१२ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने.

Anita Dipak Ripote

Digitally signed by Anita Dipak Ripote
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Law And Judiciary Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=28bdb8b03e204307a26238ccccb76a2c1eaa9ed4838f450b88dfb9ca9793b4b5, serialNumber=25e18795e96deb90b1428c41cb6c87bc90c3bb1f0ea059da3e0a07a3bc00c6c8, cn=Anita Dipak Ripote
Date: 2018.01.24 15:32:29 +05'30'

(अनिता रिपोटे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा.महाप्रबंधक, मा.उच्च न्यायालय, मुंबई
२) प्रबंधक (निरिक्षणे २), मा.उच्च न्यायालय, अपिल शाखा, मुंबई,
३) प्रमुख जिल्हा सत्र न्यायाधीश,सोलापूर,
४) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र मुंबई,
५) महालेखापाल (लेखा परिक्षा), महाराष्ट्र, मुंबई,
६) जिल्हा कोषागार अधिकारी, सोलापूर,
७) उप जिल्हा कोषागार अधिकारी,सोलापूर,
८) वित्त विभाग (व्यय-५), मंत्रालय, मुंबई,
९) सार्वजनिक बांधकाम विभाग (इमा-२), मंत्रालय, मुंबई,
१०) विधि व न्याय विभाग (का.९/२३), मंत्रालय, मुंबई,
११) निवडनस्ती.